वर्ष- १२ अंक- २७ मुंबई, मंगळवार,१९ मे २०२६ ते २५ मे २०२६ पृष्ठ-४

ठाणे आवृत्ती

मराठी साप्ताहिक

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

मूल्य २/- रुपये

POSTAL REGISTRATION No. PLG/205/2025- 2027

पोलीस बातमी पत्र

POLICE BATMI PATRA

संपादक : दिपक मोरेश्वर नाईक

PG|2 NEET पेपरफुटीप्रकरणी CBI नं अटक केलेले शिवराज मोटेगावकर कोण आहेत? त्यांच्या RCC क्लासेसची सुरुवात कशी झाली?

3 शासकीय कर्मचारी पुन्हा एकदा फसले की..?


साध्या वेशातील पोलीस, विनाचिन्हांकित गाड्या अन रात्री छापा; 4

www.policebatmipatra.in policebatmi police batmi patra policebatmipatra policebatmipatra@gmail.com

प्रेमसंबंधातून खंडणीचा कट; प्रियकराची हत्या करून मृतदेह ड्रममध्ये टाकला, मुंब्रा पोलिसांकडून गुन्ह्याची उकल

ठाणे : प्रेमसंबंधातून उद्भवलेल्या वादातून खंडणी उकळण्याचा कट रचत प्रियकराची निर्घृण हत्या करून मृतदेह ड्रममध्ये भरून गटारीत फेकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मुंब्रा पोलिसांनी या क्लिष्ट गुन्ह्याची उकल करत मृताच्या प्रेयसीसह तिच्या भावाला अटक केली असून आणखी दोघांचा शोध सुरू आहे. अरबाज मकसुदअली खान (रा. मुंब्रा) हा ३ एप्रिल २०२६ रोजी दादर येथे कामाचे पैसे घेण्यासाठी जात असल्याचे सांगून घराबाहेर पडला होता. मात्र तो घरी परतला नाही. यानंतर त्याचे वडील मकसुद अली खान यांनी मुंब्रा पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर मानव मिसिंग रजिस्टर क्रमांक ९६/२०२६ अन्वये बेपत्ता नोंद करण्यात आली होती. पोलीस उपनिरीक्षक सावंत हे तपास करत असताना अरबाजच्या मोबाईल कॉल डिटेल्सचे तांत्रिक विश्लेषण करण्यात आले. त्यात त्याचा मोबाईल शेवटचा वसईतील भोईदापाडा परिसरात सक्रिय असल्याचे समोर आले. त्याच दिवशी अरबाजची प्रेयसी मेहजबीन हिचेही मोबाईल लोकेशन वसईत आढळल्याने पोलिसांचा संशय बळावला. मेहजबीनला चौकशीसाठी ताब्यात घेतल्यानंतर सुरुवातीला तिने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र सखोल चौकशीत तिने पती हसन, भाऊ तारीक शेख आणि मित्र मोज्जम तालीब पठाण यांच्या मदतीने अरबाजची हत्या केल्याची कबुली दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, आरोपींनी अरबाजला वसई येथे बोलावून त्याच्याकडे पैशांची मागणी केली. पैसे देण्यास असमर्थ ठरल्यानंतर त्याचे हातपाय बांधून प्लास्टिकच्या पाइपने मारहाण करण्यात आली. यात त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह हिरव्या रंगाच्या ड्रममध्ये भरून वालीव पोलीस ठाणे हद्दीतील निर्जन नाल्यात फेकून देण्यात आला. या प्रकरणी मुंब्रा पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत कलम १४०, ३(५), १०३(१) आणि २३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ठाणे पश्चिम प्रादेशिक





विभागाचे अपर पोलीस आयुक्त विनायक देशमुख, पोलीस उपायुक्त सुभाष बुरसे आणि सहाय्यक पोलीस आयुक्त प्रिया डमाळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनिल शिंदे, पोलीस निरीक्षक शरद कुंभार आणि त्यांच्या पथकाने तपास करत आरोपी तारीक शेख याने दाखविलेल्या ठिकाणावरून मृतदेह ताब्यात घेतला. मेहजबीन खातून इकरान शेख आणि तिचा भाऊ तारीक इकरान शेख यांना ७ मे रोजी अटक करण्यात आली असून त्यांना १४ मेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. दरम्यान, मेहजबीनचा पती हसन आणि मोज्जम तालीब पठाण हे दोघे फरार असून त्यांचा शोध सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. मुंब्रा परिसरात राहणारा अरबाज मकसूद अली खान अचानक बेपत्ता झाला होता. अनेक तास संपर्क न झाल्याने कुटुंबीयांनी त्याचा शोध सुरू केला. नातेवाईक आणि मित्रांकडे चौकशी करूनही काहीच माहिती न मिळाल्याने अखेर त्यांनी मुंब्रा पोलिस ठाण्यात मिसिंगची तक्रार दाखल केली. सुरुवातीला पोलिसांनी बेपत्ता व्यक्ती म्हणून तपास सुरू केला. मात्र तपास जसजसा पुढे गेला तसतसे या प्रकरणामागे काहीतरी गंभीर असल्याचा संशय पोलिसांना येऊ लागला. पोलिसांनी अरबाजच्या मोबाईल कॉल डिटेल्स, सीडीआर, लोकेशन ट्रॅकिंग आणि तांत्रिक तपास सुरू केला. तपासादरम्यान अरबाजचे शेवटचे लोकेशन वसोर्वा परिसरात आढळून आले. त्यानंतर पोलिसांनी त्या परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि संबंधित व्यक्तींची माहिती गोळा करण्यास सुरुवात केली. तपासादरम्यान पोलिसांना अरबाजचे मेहजबीन शेख नावाच्या विवाहित महिलेसोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी मेहजबीनला चौकशीसाठी ताब्यात घेतले. सुरुवातीला मेहजबीनने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तांत्रिक पुरावे आणि लोकेशन डिटेल्स समोर ठेवत चौकशीचा दबाव वाढवला. आणि अखेर तिने संपूर्ण कटाची कबुली दिली. तिने पोलिसांना दिलेल्या माहितीत तिचा पती हसन शेख, भाऊ तारिक शेख आणि त्यांचा मित्र मोज्जम पठाण यांच्या मदतीने अरबाजला वसोर्वा येथे बोलावण्यात आले होते. आरोपींनी आधी अरबाजकडे पैशांची मागणी केली. मात्र त्याने पैसे देण्यास नकार दिल्यानंतर वाद विकोपाला गेला. आरोपींनी अरबाजचे हातपाय बांधले आणि त्याला अमानुष मारहाण करण्यास सुरुवात केली. प्लास्टिकच्या पाइपने त्याच्यावर बेछूट हल्ला करण्यात आला. आणि गंभीर मारहाणीमध्ये अरबाजचा मृत्यू झाला. हत्या झाल्यानंतर आरोपी घाबरले. मात्र गुन्हा लपवण्यासाठी त्यांनी थंड डोक्याने पुरावे नष्ट करण्याचा कट रचला. आरोपींनी अरबाजचा मृतदेह एका हिरव्या रंगाच्या प्लास्टिक ड्रममध्ये भरला. त्यानंतर निर्जन ठिकाणी नेऊन तो ड्रम गटारात फेकून दिला. मृतदेह कायमचा लपवला जाईल आणि पोलिसांना कोणताही पुरावा मिळणार नाही, असा आरोपींना विश्वास होता. मात्र, मुंब्रा पोलिसांनी तांत्रिक तपास,कॉल डिटेल्स आणि संशयितांच्या हालचालींचा बारकाईने अभ्यास करत अखेर संपूर्ण कट उघडकीस आणला.या प्रकरणात पोलिसांनी मेहजबीन शेख,तिचा पती हसन शेख, भाऊ तारिक शेख आणि मित्र मोज्जम पठाण यांना ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे. पोलिसांकडून हत्या, पुरावे नष्ट करणे आणि कट रचल्याप्रकरणी गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. प्रेमसंबंधातून इतक्या क्रूर पद्धतीने हत्या झाल्याची घटना समोर आल्यानंतर मुंब्रा परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ज्या नात्यात प्रेम आणि विश्वास होता, त्याच नात्याने अखेर मृत्यूचा मार्ग दाखवला. एका अपूर्ण प्रेमकथेचा शेवट रक्ताने आणि विश्वासघाताने झाला.

कल्याण रेल्वे स्थानकात अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार; आरोपी सौरभ सोनावणे अटक

कल्याण : पुण्यातील नसरापूर प्रकरणाची धक्कादायक आठवण अद्याप ताजी असतानाच मुंबई उपनगरातील कल्याण रेल्वे स्थानकात आणखी एक नारकीय घटना घडली आहे. कल्याण रेल्वे यार्डात एका अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. आरोपीने मुलीचा मोबाईल फोन हिसकावून घेत तिला पोलिस स्टेशनच्या बहाण्याने यार्डात नेले आणि अत्याचार केला. रेल्वे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपी सौरभ सोनावणे याला तातडीने अटक केली आहे.



हा अल्पवयीन मुलगी अहिल्यानगरमधून आपल्या मामाच्या घरी खोपोलीला जाण्यासाठी कल्याण रेल्वे स्थानकात लोकल ट्रेनची वाट पाहत उभी होती. त्यावेळी सौरभ सोनावणे याने तिचा मोबाईल फोन हिसकावून घेतला. मुलीने मोबाईल परत मागितल्यावर आरोपीने मोबाईल हवे असेल तर माज्यासोबत पोलिस स्टेशनला चल असे सांगून तिला फसवले. त्यानंतर तो तिला कल्याण रेल्वे यार्डात घेऊन गेला आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला.

मुलीने कशीबशी आरोपीच्या तावडीतून सुटका करून रेल्वे पोलीस ठाणे गाठले आणि सारा प्रकार सांगितला. रेल्वे पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. स्थानकातील सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपी सौरभ सोनावणे याची ओळख पटवली आणि त्याला अटक करण्यात आली.

ही घटना कल्याण रेल्वे स्थानकासारख्या नेहमी गदीर्ने गजबजलेल्या ठिकाणी घडल्याने स्थानिकांमध्ये प्रचंड संताप व्यक्त होत आहे. रेल्वे प्रशासन आणि रेल्वे पोलिसांच्या सुरक्षाव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. मोठ्या प्रमाणात गर्दी असलेल्या रेल्वे स्थानकात कोणालाही कळले नाही, याबाबत आश्चर्य व्यक्त केले जात आहे.

आमदार राजेश मोरे यांची फास्ट ट्रॅक कोर्ट आणि फाशीची मागणी

या घटनेची दखल घेत स्थानिक आमदार राजेश मोरे यांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केली. अशा नराधमांना सवय झाली आहे. बहिणी-आयाांवर अत्याचार करणाऱ्यांना कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे. फास्ट ट्रॅक कोर्टात खटला चालवून या आरोपीला फाशी द्यावी, अशी मागणी आमदार मोरे यांनी केली आहे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे याबाबत लेखी मागणी करण्याची घोषणा केली आहे.

रेल्वे पोलिसांनी आरोपीविरुद्ध पोक्सो कायद्यानुसार गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे. ही घटना महिलांच्या सुरक्षेबाबत पुन्हा एकदा चिंता निर्माण करणारी ठरली आहे.

सीसीटीव्ही आणि तांत्रिक तपासाच्या जोरावर वर्तकनगर पोलिसांची मोठी कामगिरी; चोरीची इको कार हस्तगत, आरोपी अटकेत



ठाणे : वर्तकनगर पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज आणि तांत्रिक तपासाच्या आधारे चोरीस गेलेली इको कार हस्तगत करत आरोपीला अटक करण्यात यश मिळवले आहे. या कारवाईमुळे परिसरातील वाहनचोरीच्या घटनांवर आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. पोलिसांनी केलेल्या सखोल तपासादरम्यान आरोपीने आणखी तीन कार चोरीच्या गुन्ह्यांची कबुली दिली असून, त्या अनुषंगाने पुढील तपास सुरू आहे. आरोपीकडून आणखी गुन्ह्यांचा उलगडा होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. या संपूर्ण कारवाईत सतत चार दिवस सीसीटीव्ही फुटेजचे बारकाईने विश्लेषण करून आरोपीपर्यंत पोहोचण्यात पोलीस शिपाई सस्ते यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या चिकाटी आणि तांत्रिक कौशल्याचे वरिष्ठांकडून विशेष कौतुक करण्यात येत आहे. वर्तकनगर पोलिसांच्या या धडाकेबाज कारवाईमुळे नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अनैतिक संबंधातून महिलेची हत्या; दिराला झारखंडमधून अटक

कल्याणमधील धक्कादायक प्रकार; पोलिसांची वेगवान कारवाई, आरोपी नेपाळला पसार होण्याच्या तयारीत



कल्याण : कल्याणमध्ये अनैतिक संबंधातून एका महिलेची तिच्याच दिराने हत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. महिलेचे डोके भिंतीवर आपटून गंभीर जखमी केल्यानंतर आरोपी फरार झाला होता. खडकपाडा पोलिसांनी झारखंडमधून त्याला अटक केली असून, काही मिनिटांचा विलंब झाला असता तर आरोपी नेपाळमध्ये पसार झाला असता, अशी माहिती पोलिसांनी दिली. पोलिसांच्या माहितीनुसार, २७ एप्रिल रोजी कल्याण पश्चिमेतील एका घरातून गुड्डू देवी यांना गंभीर जखमी अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान ११ मे रोजी त्यांचा मृत्यू झाला. तपासादरम्यान मृत महिला आणि तिचा दिर बम बम कुमार यांच्यात प्रेमसंबंध असल्याचे निष्पन्न झाले. मात्र, काही दिवसांपासून महिलेने आरोपीशी बोलणे बंद केले होते. याच कारणावरून आरोपीने तिच्या घरी जाऊन वाद घातला. संतापाच्या भरात त्याने महिलेचे डोके भिंतीवर आपटल्याने त्या गंभीर जखमी झाल्या. त्यानंतर आरोपी घटनास्थळावरून पसार झाला. घटनेनंतर आरोपीचा मोबाईल बंद असल्याने तपासात अडचणी निर्माण झाल्या होत्या. पोलिसांनी आरोपीच्या नातेवाईकांकडून झारखंडमधील मूळ गावाची माहिती मिळवून तपासाची सूत्रे हलवली. पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक होनमाने आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमरनाथ वाघमोडे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथक तयार करण्यात आले. हे पथक झारखंडमधील गोंडा जिल्ह्यात पोहोचले. स्थानिक पोलिसांच्या मदतीने आरोपीचा शोध घेण्यात आला. दरम्यान, पोलीस आपल्या मागावर असल्याची माहिती आरोपीला मिळाल्याने तो नेपाळमध्ये पळून जाण्याच्या तयारीत होता. मात्र, पोलिसांनी वेळीच कारवाई करत त्याला ताब्यात घेतले. आरोपीला झारखंडहून कल्याणमध्ये आणल्यानंतर न्यायालयात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अधिकारी भूषण देवरे करत आहेत. मृत महिलेला दोन मुले असून आरोपीलाही एक मुलगी असल्याची माहिती पोलिसांनी दिली. तसेच दोन्ही कुटुंबांना या संबंधांची माहिती होती, असेही तपासात समोर आले आहे.

कल्याण गुन्हे शाखेची कारवाई; मुदत संपलेल्या खाद्यपदार्थांवर बनावट स्टिकर लावून विक्री करणारे दोघे अटकेत



कल्याण : नागरिकांच्या आरोग्याशी थेट खेळ करणाऱ्या गैरप्रकाराचा पदार्फाश करत कल्याण गुन्हे शाखेच्या पथकाने डोंबिवली आणि भिवंडी येथील दोन इसमांना अटक केली आहे. मुदत संपलेल्या व्हिटॅमिन्स आणि पौष्टिक खाद्यपदार्थांवरील मूळ एक्सपायरी डेट झाकून त्यावर बनावट स्टिकर लावून नव्याने मुदत वाढविल्याचे भासवून हे पदार्थ बाजारात विक्रीसाठी पाठवले जात असल्याचे तपासात उघड झाले आहे.

या कारवाईदरम्यान पोलिसांनी सुमारे २६ लाख ६३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. यात विविध प्रकारचे व्हिटॅमिन्स, पौष्टिक खाद्यपदार्थ, पॅकिंग साहित्य तसेच बनावट स्टिकर्सचा समावेश आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी मुदत संपलेल्या उत्पादनांच्या बॉक्सवरील मूळ एक्सपायरी डेट काढून त्याठिकाणी नव्याने तयार केलेले स्टिकर चिकटवत होते. त्यानंतर हे पदार्थ 'आरोग्यदायी' आणि 'पौष्टिक' असल्याचा दावा करत बाजारात विक्रीसाठी वितरित केले जात होते.

या प्रकारामुळे नागरिकांच्या आरोग्याला गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. विशेषतः व्हिटॅमिन्स आणि खाद्यपदार्थांच्या स्वरूपातील उत्पादने मुदत संपल्यानंतर वापरल्यास त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात, असे तज्ज्ञांचे मत आहे.

गुन्हे शाखेच्या पथकाने मिळालेल्या गुप्त माहितीनुसार छापा टाकून हा प्रकार उघडकीस आणला. याप्रकरणी संबंधित आरोपींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

प्रवेशासाठी 'डोनेशन'ची मागणी; भिवंडीत उर्दू शाळेच्या मुख्याध्यापिकेसह तिघांना अटक



भिवंडी : शहरातील एका अनुदानित उर्दू माध्यमाच्या शाळेत विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी डोनेशनच्या नावाखाली अतिरिक्त फी उकळण्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी ठाणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) मुख्याध्यापिकेसह खासगी लिपिक आणि खासगी शिक्षिकेला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आठवी इयत्तेत प्रवेश देण्यासाठी एका पालकाकडे पाच हजार रुपयांची मागणी करण्यात आली होती. संबंधित पालकाने याबाबत एसीबीकडे तक्रार दाखल केली. तक्रारीची पडताळणी केल्यानंतर एसीबीच्या अधिकाऱ्यांनी सापळा रचला. त्याअनुषंगाने आरोपींना चार हजार रुपयांची रक्कम स्वीकारताना रंगेहाथ पकडण्यात आले. या कारवाईत मुख्याध्यापिका, खासगी शिक्षिका आणि लिपिक या तिघांना ताब्यात घेण्यात आले. या प्रकरणी शांतीनगर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपींना न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, अनुदानित शाळांमधील प्रवेश प्रक्रियेत आर्थिक गैरप्रकार होत असल्याच्या तक्रारी वेळोवेळी समोर येत असून, या कारवाईमुळे शैक्षणिक क्षेत्रात खळबळ

NEET पेपरफुटीप्रकरणी CBI नं अटक केलेले शिवराज मोटेगावकर कोण आहेत? त्यांच्या RCC क्लासेसची सुरुवात कशी झाली?



लातूरमधील एका प्रसिद्ध क्लासेसचे संचालक शिवराज मोटेगावकर यांना आज (18 मे) पुण्यातून केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं (CBI) अटक केली. त्यानंतर त्यांना दिल्लीतील Rouse Ave»»fue Court येथे हजर करण्यात आलं.

त्याठिकाणी CBI ने मोटेगावकर यांची 10 दिवसांची कोठडी मागितली होती. पण मोटेगावकर यांचे वकील म्हणाले, ही कोठडी जास्त होत आहे. एवढ्या जास्त दिवसांची गरज काय आहे? त्यावर शेवटी कोटार्ने CBI ला मोटेगावकर यांची 9 दिवसांची कोठडी दिली.

कोर्टात माहिती देताना उइक वकील म्हणाले की, रविवारी (17 मे) सायंकाळी 7.15 वाजता मोटेगावकर यांना पुण्यातून अटक करण्यात आली आहे. तसंच याआधीही काही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

याआधी CBI ने दिलेल्या माहितीनुसार, शिवराज मोटेगावकर यांनी 2026 चा ठएएळ UGचा फुटलेला पेपर वितरित केला आहे. यामध्ये एक मोठी साखळी असल्याचं आम्हाला समजलं आहे. आता आम्ही या सगळ्यांच्या लिंक तपासत आहोत. याशिवाय CBI वकिलांनी कोर्टात दिलेल्या माहितीनुसार, आरोपी फ्छउ कोचिंग क्लास चालवत असत. तर संशयित आरोपी प्रल्हाद कुलकर्णी हेही मोटेगावकर यांच्या संपर्कात होते.

कोटार्ने मोटेगावकर आणि CBI यांच्या वकिलांची बाजू ऐकल्यानंतर मोटेगावकर यांना 9 दिवसांची CBI कोठडी सुनावली आहे.

या दरम्यान, माध्यमांच्या प्रतिनिधी यांनी मोटेगावकर यांना काही प्रश्न विचारले पण त्यावर बोलण्यास त्यांनी नकार दिला.





कोण आहेत शिवराज मोटेगावकर?

मराठवाड्यातील 'लातूर पॅटर्न' म्हटलं की, काही मोजकी नावं सर्वप्रथम घेतली जातात. त्यामध्ये प्रा. शिवराज मोटेगावकर यांचं नाव अग्रक्रमाने घेतलं जातं.

केमिस्ट्री विषयाचे प्राध्यापक म्हणून ओळख असलेल्या मोटेगावकर यांनी NEET, JEE परीक्षा मार्गदर्शन क्षेत्रात स्वतःचं स्वतंत्र स्थान निर्माण केलं.

लातूरमधील RCC अर्थात रेणुकाई करिअर सेंटर या कोचिंग संस्थेचे ते संस्थापक आहेत.

2003 साली या संस्थेची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीला RCC द्वारे MH-CET साठी कोचिंग दिले जायचे.

दरम्यान, मोटेगावकर यांची 17 मे रोजी जवळपास 10 तास चौकशी करण्यात आली. त्यानंतर 18 मे रोजीही त्यांची चौकशी सुरू होती. त्यानंतर त्यांच्यावर अटकेची कारवाई करण्यात आली.

या प्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागानं (CBI) रविवारपर्यंत 9 आरोपींना अटक केली. त्यात आता शिवराज मोटेगावकरांची भर पडल्यानं एकूण अटक झालेल्या आरोपींची संख्या 10 वर पोहोचलीय.

NEET, JEE आणि MHT-CET परीक्षांसाठी महाराष्ट्रातील मोठ्या कोचिंग नेटवर्कपैकी RCC एक मानलं जातं.

RCCच्या अधिकृत वेबसाईटवरील माहितीनुसार, शिवराज मोटेगावकर यांनी केमिस्ट्री विषयात टॉप करताना सुवर्णपदक मिळवलं. मात्र त्याठिकाणी त्यांनी कोणत्याही विद्यापीठाचा उल्लेख केलेला नाही.

त्यांनी SET/NET-JRF, GATE, BARC, DRDO आणि TIFR यांसारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षा पात्र केल्याचा दावा संस्थेकडून करण्यात आला आहे.

मोटेगावकर यांनी घरातून शिकवणी सुरू केली आणि त्यानंतर 2003 मध्ये रेणुकाई केमिस्ट्री क्लासेसची स्थापना झाली. पुढे ही संस्था RCC PÔtter»»f या नावाने विस्तारली.

फ्छउ या संस्थेने मराठवाड्यासह पुणे, नाशिक, नांदेड, छत्रपती संभाजीनगर आणि इतर शहरांमध्ये शाखा सुरू केल्या.

RCCच्या वेबसाईटनुसार, हजारो विद्यार्थ्यांना वैद्यकीय आणि अभियांत्रिकी प्रवेश परीक्षांसाठी मार्गदर्शन केल्याचा दावा संस्था करते.

आर्थिकदृष्ट्या दुर्बल विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिल्याचाही उल्लेख फ्छउ ने केला आहे.

सोशल मीडियावरही मोटेगावकर यांचा मोठा वावर आहे. इंस्टाग्राम आणि फेसबुकच्या माध्यमातून ते विद्यार्थ्यांशी संवाद साधतात.

परीक्षा, अभ्यास पद्धती आणि करिअर मार्गदर्शनाशी संबंधित व्हीडिओ आणि पोस्ट नियमितपणे प्रसिद्ध केल्या जातात.

लातूरमध्ये 11वी आणि 12वी NEET आणि JEE ची तयारी करण्यासाठी या क्लासेसला मोठी पसंती दिली जाते. महाराष्ट्रभरातील या संस्थांमध्ये मिळून सुमारे 10 हजारपेक्षा जास्त विद्यार्थी प्रवेश घेतात.

11वीच्या विद्यार्थ्यांकडून अंदाजे 40 हजार रुपये, तर 12वीच्या विद्यार्थ्यांकडून 50 हजार रुपये इतकी वार्षिक फी घेतली जाते. परीक्षेपूर्वी दिले जाणारे गेस पेपर आणि प्रॅक्टिस टेस्टमुळे RCC क्लासेसची ओळख लातूर पॅटर्नमध्ये अधिक वाढली.

3 मे रोजी NEET परीक्षेनंतर मोटेगावकर यांनी स्वतः त्यांच्या फेसबुकवर एक व्हीडिओ पोस्ट केला होता. त्या व्हीडिओमध्ये एका विद्यार्थ्यानें सांगितलं की, 42 प्रश्न हे सरांनी दिलेल्या गेस पेपरमधूनच आले.

NEET UG 2026 रद्द झाल्यावर मोटेगावकर काय म्हणाले?

पेपरफुटीनंतर NEET UG 2026 परीक्षा रद्द करण्यात आली. त्यानंतर शिवराज मोटेगावकर यांनी त्यांच्या क्लासेसच्या युट्यूब चॅनेलवर एक व्हीडिओ प्रसिद्ध केला होता.

त्यामध्ये त्यांनी मुलांना परीक्षा रद्द झाली म्हणून घाबरून जाऊ नका, असं आवाहन केलं होतं. तसंच, RCC पुन्हा या परीक्षेच्या तयारीसाठी मोफत ऑनलाइन क्लासेस सुरू करणार असल्याचं म्हटलं.

फेरपरीक्षेमुळे मेरिट आणखी वाढेल, असं ते म्हणाले. "आम्ही ज्या सराव चाचण्या घेऊ, त्याच्या बाहेरील प्रश्न पडणारच नाही," असा दावाही त्यांनी या व्हीडिओतून केला.

याआधी त्यांनी प्रसिद्ध केलेल्या सोशल मीडियावरील व्हीडिओंमधूनही 3 मे रोजी घेण्यात आलेल्या NEET UG 2026 परीक्षेत फ्छउ कोचिंग क्लासेसने जे शिकवलं, तेच परीक्षेत आल्याचा दावा त्यांनी आणि त्यांच्या क्लासमधल्या विद्यार्थ्यांनी केल्याचं दिसतं.

मोटेगावकरांच्या अटकेविषयी सीबीआयनं काय म्हटलं?

मोटेगावकर यांना अटक केल्यानंतर तयार करण्यात आलेल्या मेमोमध्ये अटकेची कारणं नमूद करण्यात आली आहेत.

त्यात म्हटलं आहे, "तपासामध्ये असे निष्पन्न झाले आहे की, शिवराज रघुनाथ मोटेगावकर हे NEET UG परीक्षा-2026 ची प्रश्नपत्रिका लीक करणे आणि तिचं वितरण करणे या गुन्ह्यात सहभागी असलेल्या संघटित टोळीचे सक्रिय सदस्य आहेत."

तसेच, इतर आरोपींशी संगनमत करून त्यांनी NEET UG 2026 परीक्षेची प्रश्नपत्रिका आणि तिची उत्तरं परीक्षा होण्यापूर्वीच, म्हणजेच 23 एप्रिल 2026 रोजी मिळवली होती.

14 मे 2026 रोजी शिवाजीनगर, लातूर येथील आरोपी शिवराज रघुनाथ मोटेगावकर यांच्या निवासस्थानी घेण्यात आलेल्या झडतीदरम्यान त्यांच्या मोबाईलमध्ये NEET UG 2026 चे लीक झालेले प्रश्न आढळून आले.

तसंच, शिवराज मोटेगावकर यांनी इतर आरोपींसोबत लीक झालेल्या प्रश्नपत्रिका आणि उत्तरपत्रिकांच्या प्रती विवेक पाटील यांच्यासह अनेकांना पुरवल्या, असंही तपासात पुढे आल्याचं यात म्हटलं आहे. मोटेगावकर यांनी लीक झालेल्या NEET UG 2026 परीक्षा प्रश्नपत्रिकांच्या हाताने लिहिलेल्या प्रती ज्या व्यक्तींना पुरवल्या, त्या सर्वांची नावं त्यांनी उघड केलेली नाहीत.

तपासादरम्यान आरोपीने परीक्षेनंतर लीक झालेल्या प्रश्नपत्रिका नष्ट करून पुरावे नष्ट करण्याचाही प्रयत्न केल्याचं या मेमोमध्ये म्हटलं आहे.



पुण्याच्या ब्युटीपार्लरमध्ये रचला गेला NEET पेपरफुटीचा कट? CBI च्या तपासात समोर आलेलं सत्य पाहून थक्क व्हाल

विद्येचे माहेरघर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यातून देशभर पेपरफुटीचे जाळे पसरल्याचा धक्कादायक खुलासा समोर आला आहे. या संपूर्ण रॅकेटमध्ये पुण्यातील मनीषा वाघमारे हिची महत्त्वाची भूमिका असल्याचे तपासातून उघड झाले असून, प्रकरणाने शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

देशभरात खळबळ उडवून देणाऱ्या नीट (NEET) पेपरफुटी प्रकरणात आता केंद्रीय अन्वेषण विभागाने (CBI) धक्कादायक खुलासे केले आहेत. वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेश परीक्षेतील या गैरप्रकाराचे धागेदोरे थेट पुण्यापर्यंत पोहोचले असून, पुणे हेच या संपूर्ण रॅकेटचे महत्त्वाचे केंद्र असल्याचे तपासातून समोर आले आहे. विशेष म्हणजे, पुण्यातील मनीषा वाघमारे हिने या पेपरफुटीच्या साखळीत प्रमुख भूमिका बजावल्याचा संशय अधिक गडद झाला आहे.

पेपरचा प्रवास थेट राजस्थानपर्यंत

सीबीआयच्या तपासानुसार, पेपरफुटीची ही साखळी अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने देशातील विविध राज्यांमध्ये पसरवण्यात आली. पुण्यातून सुरू झालेला हा प्रवास थेट राजस्थानपर्यंत पोहोचल्याने तपास यंत्रणाही हादरून गेल्या आहेत. या प्रकरणामुळे स्पर्धा परीक्षांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

अशी झाली साखळी उघड

तपासात उघड झालेल्या माहितीनुसार, मनीषा वाघमारे हिने सर्वप्रथम हा पेपर अहिल्यानगरमधील धनंजय नावाच्या व्यक्तीकडे दिला. त्यानंतर धनंजयने पेपर नाशिकमधील शुभम याच्याकडे पोहोचवला. पुढे शुभमने या साखळीचा विस्तार करत पेपर गुरुग्राममधील यश यादव याच्याकडे पाठवला. यानंतर यश यादवने राजस्थानमधील जयपूरजवळील जमवा रामगड परिसरातील मांगीलाल आणि दिनेश बिवाल यांच्यापर्यंत हा पेपर पोहोचवल्याचे समोर आले आहे.

सीबीआयला संशय

या संपूर्ण साखळीतील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, मांगीलालने हा पेपर आपल्या मुलगा विकास याला दिला. विकास हा सीकर येथे शिक्षण घेत असल्याची माहिती समोर आली आहे. त्याने पुढे आपल्या मित्रांना हा पेपर विकून मोठ्या प्रमाणात पैसे कमावल्याचा आरोप आहे. त्यामुळे या रॅकेटमध्ये अनेक विद्यार्थी आणि एजंट्स सहभागी असल्याचा संशय सीबीआयला आहे.

हा पेपर नेमका आला कुठून?

दरम्यान, तपासातील सर्वात महत्त्वाचा प्रश्न म्हणजे मनीषा वाघमारेकडे हा पेपर नेमका आला कुठून? सीबीआयला संशय आहे की, या प्रकरणात पी. व्ही. कुलकर्णी यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असू शकते. तपास यंत्रणांच्या मते, कुलकर्णी यांच्याकडूनच पेपर मनीषापर्यंत पोहोचला असावा. या संशयाची खातरजमा करण्यासाठी आता सीबीआय दोघांची समोरासमोर चौकशी करण्याची तयारी करत असल्याची माहिती समोर आली आहे.

धक्कादायक माहिती समोर

मनीषा वाघमारेच्या मोबाईलमधील डेटा, कॉल रेकॉर्ड आणि बँक व्यवहारांची तपासणी करताना अनेक धक्कादायक माहिती समोर आल्याचे सूत्रांनी सांगितले. आर्थिक व्यवहार, सततचे संपर्क आणि काही संशयास्पद व्यवहारांमुळे तपासाची दिशा अधिक गंभीर बनली आहे. या प्रकरणात आणखी काही मोठी नावे समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह

दरम्यान, NEET सारख्या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेच्या पेपरफुटीमुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, दोषींवर कठोर कारवाईची मागणी जोर धरत आहे. सीबीआयचा तपास जसजसा पुढे सरकत आहे, तसतसे या घोटाळ्यातील आणखी धक्कादायक रहस्य उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

पोलीस बातमी पत्र

महामुंबई

३

मुंबई, मंगळवार, १९ मे २०२६ ते २५ मे २०२६

संपादकीय

शासकीय कर्मचारी पुन्हा एकदा फसले की.. ?



संपादक दिपक मोरेश्वर नाईक



शासकीय कर्मचाऱ्यांचा संप तेव्हाच यशस्वी म्हणता येईल, जेव्हा रिक्त पदे भरली जातील, पेन्शनचा प्रश्न कायमचा सुटेल, सेवानिवृत्तीचे वय वाढेल आणि कर्मचाऱ्यांना सन्मानाने काम करता येईल. महाराष्ट्राच्या शासकीय यंत्रणेला निर्भय, प्रामाणिक आणि दूरदृष्टीचे नेतृत्व हवे आहे. एप्रिल २०२६ च्या अखेरच्या आठवड्यात महाराष्ट्राच्या शासकीय यंत्रणेला एक मोठा हादरा बसला. राज्यातील सुमारे १७ ते १८ लाख सरकारी कर्मचारी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर गेले. महसूल कार्यालये ठप्प झाली, जमीन-घर खरेदी विक्रीचे व्यवहार थांबले, विवाह नोंदणी बंद पडली आणि सामान्य नागरिक भरडला गेला. चौथ्या दिवशी म्हणजे २५ एप्रिल रोजी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी सकारात्मक आश्वासने दिल्यानंतर संप मागे घेण्यात आला. पण प्रश्न उरतो हा संप खरोखर फलदाई झाला का, की केवळ आश्वासनांच्या धुक्यात हरवून गेला? शासकीय कर्मचाऱ्यांना पुन्हा एकदा फसवून गेला? बरं शासकीय कर्मचाऱ्यांनी वेठीस धरलं सामान्य जनतेलाच ! त्यांचा ना सरकारशी काही संबंध ना शासकीय कर्मचाऱ्यांशी मग त्यांनी हा त्रास का सहन करायचा? मुळात शासकीय कर्मचाऱ्यांना संप करून साध्य काय झाले या प्रश्नाचे उत्तर शोधायचे असेल, तर संपामागील मूळ कारणे, कर्मचाऱ्यांची वास्तवस्थिती, शासनाची उदासीनता आणि राजकीय पक्षांचा दृष्टिकोन या सर्व बाबींचा एकत्रित विचार करणे आवश्यक आहे. कामाचा ताण एक अदृश्य संकट महाराष्ट्रात शासकीय पदे मोठ्या संख्येने रिक्त आहेत. वर्षानुवर्षे भरती प्रक्रिया रखडलेल्या असल्याने जे कर्मचारी सेवेत आहेत, त्यांच्यावर दुप्पट-तिप्पट कामाचा बोजा पडत आहे. एखाद्या तालुक्याच्या ठिकाणी जेथे दहा कर्मचारी असणे आवश्यक आहे, तेथे चार-पाच जणच काम करतात. परिणामी नागरिकांची कामे रेंगाळतात, सरकारी अधिकाऱ्यांवर प्रचंड दबाव येतो आणि एकूण प्रशासकीय गुणवत्ता ढासळते. भरतीचा प्रश्न केवळ कर्मचाऱ्यांपुरता मर्यादित नाही तो सामान्य जनतेलाही थेट भोगावा लागतो. आरोग्य विभागात डॉक्टर-परिचारिकांची पदे रिक्त, महसूल विभागात तलाठी नाही, शाळांमध्ये शिक्षकच नाही हे चित्र राज्याच्या ग्रामीण भागात सर्वत्र दिसते. या पार्श्वभूमीवर कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरण्याची मागणी केवळ स्वार्थी नाही, ती व्यवस्थेच्या कार्यक्षमतेसाठी अत्यावश्यक आहे. वेतन आणि फायदे मिळूनही भ्रष्टाचार महाराष्ट्रात गेल्या दहा-बारा वर्षात सरकारी भरतीची गती कमालीची मंद राहिली आहे. भाजप असो की काँग्रेस, दोन्ही पक्षांच्या सरकारने भरतीकडे पुरेसे लक्ष दिले नाही. याची कारणे वेगवेगळी असली, तरी परिणाम एकच.. लाखो तरुण सरकारी नोकरीच्या प्रतीक्षेत वर्षे घालवतात. रिक्त पदांमुळे सेवेची गुणवत्ता ढासळते. भरती न करण्यामागे एक न बोलला जाणारा राजकीय हिशेब आहे. भरती केली की आरक्षण, न्यायालयीन प्रकरणे, राजकीय दबाव यात अडकण्याची भीती सत्ताधाऱ्यांना असते. त्यामुळे ‘घोषणा करायच्या पण भरती टाळायची’ हे अलिखित धोरण बनले आहे. हे राज्याच्या भविष्यासाठी अत्यंत घातक आहे. सातव्या वेतन आयोगानंतर सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन तुलनेने सुधारले आहे. मात्र खासगी क्षेत्रातील वेगाने वाढणाऱ्या वेतनाशी तुलना केल्यास सरकारी नोकरीचे आर्थिक आकर्षण कमी होत आहे. तरीही नोकरीची स्थिरता, निवृत्तीवेतन, वैद्यकीय सुविधा आणि रजा या फायद्यांमुळे सरकारी नोकरी अजूनही आकर्षक मानली जाते. परंतु येथेच निवृत्तीवेतनाचा वादग्रस्त प्रश्न उभा ठाकतो. २००५ नंतर सेवेत आलेल्या कर्मचाऱ्यांना नवीन राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना (नॅशनल पेन्शन स्कीम) लागू झाली. या योजनेत शेअर बाजाराशी निगडित परतावा असल्याने निवृत्तीनंतर किती पैसे मिळतील याची खात्री नाही. जुन्या पेन्शन योजनेत निश्चित रक्कम मिळत असे. या अनिश्चिततेमुळे कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड असुरक्षितता आहे आणि ती भावना रास्त आहे. निवृत्तीनंतरचे जगणे बाजाराच्या चढउतारावर अवलंबून असणे, हे कोणत्याही कर्मचाऱ्यासाठी मानसिकदृष्ट्या त्रासदायक आहे. वेतन आणि फायदे मिळूनही काही विभागांमध्ये ‘टेबलाखालून पैसे’ घेण्याची प्रथा जिवंत आहे. जमीन नोंदणी, परवाने, शिष्यवृत्त्या, रेशन वितरण यात अनेकदा सामान्य माणसाला ‘काम करवून घ्यायला’ अतिरिक्त पैसे मोजावे लागतात. हे वास्तव नाकारता येत नाही. मात्र हेही लक्षात घ्यायला हवे की भ्रष्टाचाराचे मूळ केवळ कर्मचाऱ्यांमध्ये नाही ते व्यवस्थेत आहे. जिथे एकच कर्मचारी दहा कामे करतो आणि नागरिकाला काम करवून घ्यायचे असते, तिथे 'जलद सेवे'साठी पैसे देण्याची मानसिकता तयार होते. त्यामुळे भ्रष्टाचार रोखायचा असेल, तर कर्मचाऱ्यांना दोष देण्यापेक्षा व्यवस्था सुधारणे अधिक परिणामकारक ठरेल. उद्धव ठाकरे यांची त्वरित निर्णय क्षमता हा संप फडणवीस यांच्या भाजप नेतृत्वाखालील महायुती सरकारच्या काळात झाला. मात्र हे प्रश्न एका सरकारने निर्माण केलेले नाहीत. ते वर्षानुवर्षांच्या राजकीय उदासीनतेचे फळ आहे. उद्धव ठाकरे यांच्या महाविकास आघाडी सरकारने २०२० मध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू करून एक महत्त्वाची मागणी तातडीने मान्य केली होती. त्या बैठकीचा अनुभव मी घेतला आहे. ग. दि. कुलथे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळासोबत सह्याद्री येथे ती बैठक झाली होती. नेहमीप्रमाणे सरकारी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांची लांबलचक यादी होती मुख्यमंत्र्यांसमोर. त्यांनी त्या सगळ्याबाबत त्यांचे विश्लेषण ऐकले आणि त्यातील काही मागण्या त्वरित मान्य केल्या. आठवड्याचे पाच दिवस, महिला कर्मचाऱ्यांना सुविधा आदी मागण्या लगेच मान्य झाल्याने सरकारी कर्मचारीही आनंदी झाले होते. मात्र त्यांच्या अडीच वर्षांच्या कारकीर्दीत कोविड महामारीमुळे आर्थिक निर्णय घेणे कठीण झाले. जुनी पेन्शन योजना किंवा सेवानिवृत्ती वय वाढवण्याचे निर्णय त्यांनाही घेता आले नाहीत. त्यानंतर आलेल्या शिंदे आणि आताच्या भाजप सरकारने या कर्मचाऱ्यांना खिजगणतीत धरले नाही. भाजप सरकारने या संपाला सुरुवातीला 'बेकायदेशीर' ठरवले आणि कारवाईचा इशारा दिला. मात्र चार दिवसांत जनमानसावरील दबाव वाढल्यावर चर्चेला बसले आणि आश्वासने दिली. वर्षभरात सात वेळा आंदोलन होऊनही सरकारने दखल घेतली नाही, हे शासनाचे अपयश आहे. जी आपुलकी उद्धव ठाकरे यांनी दाखवली ती नंतरच्या सरकारांनी शासकीय कर्मचाऱ्यांबाबत दाखवली नाही हे सत्य नाकारता येणार नाही. संप फलदायी की फसवा ? हा संप फलदायी झाला का? तात्कालिक दृष्टीने पाहिल्यास अंशतः होय. सरकारने पेन्शन अधिसूचना १५ दिवसांत काढण्याचे, सेवानिवृत्ती वय ६० करण्याचा विचार करण्याचे, रिक्त पदे भरण्याचे आणि मुख्यमंत्री स्तरावर त्रैमासिक चर्चेचे व्यासपीठ निर्माण करण्याचे लेखी आश्वासन दिले. विशेषतः मार्च २०२४ पासून सेवानिवृत्त झालेल्या ६,५०० कर्मचाऱ्यांना पेन्शन मिळण्याचा मार्ग मोकळा झाला हे थेट, मूर्त फलित आहे. परंतु दीर्घकालीन दृष्टीने पाहिल्यास साशंकता आहे. महाराष्ट्रातील शासकीय कर्मचाऱ्यांचा इतिहास पाहिला, तर आश्वासन आणि अंमलबजावणी यात नेहमीच मोठी दरी राहिली आहे. शिवाय या संपामुळे सामान्य नागरिकाचे प्रचंड नुकसान झाले. जमीन व्यवहार, विवाह नोंदणी, वैद्यकीय सेवा या सगळ्यावर परिणाम झाला. ज्या जनतेच्या करातून या कर्मचाऱ्यांचे वेतन मिळते, त्याच जनतेला चार दिवस त्रास सहन करावा लागला. हा नैतिक प्रश्न आहे आणि तो गांभीर्याने घ्यायला हवा. हा संप म्हणजे एका दीर्घ, दुखावलेल्या व्यवस्थेचा उत्स्फूर्त उद्रेक होता. संप म्हणजे केवळ आश्वासने मिळवण्याचे साधन बनू नये. संप हे शेवटचे हत्यार आहे आणि ते वापरण्याची वेळ आली, याचा अर्थ शासन-कर्मचारी संवादाची यंत्रणाच कोसळली आहे. मुख्यमंत्री स्तरावर त्रैमासिक चर्चेचे व्यासपीठ निर्माण झाले, तर ही यंत्रणा पुन्हा उभी राहू शकते. राजकीय पक्षांनीही आत्मपरीक्षण करायला हवे. सत्तेत असताना प्रश्न सोडवायचे नाहीत आणि विरोधात असताना आश्वासने द्यायची हा खेळ थांबणे आवश्यक आहे. कर्मचाऱ्यांचे प्रश्न हे राजकारणाचे साधन नाहीत, ती जिवंत माणसांची व्यथा आहे.

वाद आणि वस्तुस्थिती



गोविंद पानसरे यांच्या 'शिवाजी कोण होता?' या पुस्तकाच्या प्रकाशकाला शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी धमकी दिली. यानंतर गायकवाड यांनी दिलगिरी व्यक्त केली. या घटनेमुळे विचारस्वातंत्र्य आणि इतिहासाच्या अर्थांतराचा वाद पुन्हा चर्चेत आला आहे. शिवाजी महाराजांचे चरित्र सर्वसमावेशकपणे मांडणाऱ्या या पुस्तकावर बंदी घालण्याची मागणी चुकीची आहे. इतिहास वस्तुनिष्ठपणे अभ्यासणे आवश्यक आहे. अलीकडेच गोविंद पानसरे लिखित ‘शिवाजी कोण होता?’ या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना दूरध्वनीवरून अश्लील शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी शिवसेनेच्या शिंदे गटाचे आमदार संजय गायकवाड यांनी अखेर दिलगिरी व्यक्त केली. आमदार गायकवाड यांनी प्रशांत आंबी यांना अर्वाच्य भाषेत केलेली शिवीगाळ आणि दिलेली धमकीची यांची ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर गायकवाड यांच्यावर टीकेची झोड उठली होती. गायकवाड यांनी काही वादग्रस्त विधाने करण्याची ही पहिली वेळ नव्हे; याआधीही त्यांनी वादग्रस्त विधाने केली आहेत. मात्र, या धमकीच्या प्रकाराने राज्यभर मोठी खळबळ उडाली.

गोविंद पानसरे हे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे ज्येष्ठ नेते आणि विचारवंत होते. त्यांनी आपल्या लेखणीच्या माध्यमातून सामान्य जनतेपर्यंत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास पोहोचवला. सन २०१५मध्ये पानसरे यांची हत्या करण्यात आली. ही हत्या म्हणजे महाराष्ट्रातील विचारवंतांवरील हल्ल्यांच्या मालिकेतील एक दुःखद अध्याय ठरला. शिवाजी कोण होता? या अवघ्या ७४ पानांच्या पुस्तिकेतून पानसरे यांनी छत्रपती शिवरायांचे एक वेगळे, सर्वसामान्यांचे राजा म्हणून व्यक्तिमत्त्व उभे केले आहे. हे पुस्तक १९८८मध्ये प्रथम लोकवाङ्मय गृह या प्रकाशन संस्थेकडून प्रकाशित झाले होते. नंतर ते प्रशांत आंबी यांनी प्रकाशित केले. महाराष्ट्रात ते मोठ्या प्रमाणावर वाचले जाते. या पुस्तकाच्या दीड लाखांहून अधिक प्रती आजवर विकल्या गेल्या आहेत. हे पुस्तक शिवाजी महाराजांची एक धर्मनिरपेक्ष प्रतिमा मांडते. पुस्तक व्यापकपणे वाचले जाते, हेच त्या पुस्तकातील विचारांना मिळणाऱ्या लोकांच्या सकारात्मक प्रतिसादाचे लक्षण आहे.पानसरे यांनी शिवाजी महाराज ांबद्दलच्या सर्व समज-गैरसमजांना सज्जड पुराव्यानिशी छेद देत हा जाणता राजा कसा सर्व समाजाचा आणि विशेषतः सर्वसामान्य जनतेचा राजा होता, ते दाखवून दिले आहे. शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचे आणि भारताचे सांस्कृतिक प्रतीक आहेत. त्यांचे योगदान युद्ध, प्रशासन, नौदल आणि सामाजिक न्याय या सर्व क्षेत्रांत आहे. या पुस्तकात शिवाजी महाराज सर्वधर्मसमभावी, शेतकरी-कामगारांचे राजे होते, हे ठळकपणे अधोरेखित करण्यात आले आहे. हेच या पुस्तकाचे वैशिष्ट्य आहे, आणि हाच त्यावर वाद होण्यामागचा मुख्य मुद्दाही आहे. खरे बघायला गेले तर हा वाद पुस्तकाच्या शीर्षकाबद्दल नाहीच, तो महाराष्ट्रातील विचारस्वातंत्र्य, इतिहासाचे अर्थांतर आणि राजकीय भूमिकांबद्दल आहे. याआधी प्रा. मृणालिनी आहेर प्रकरणामुळे २०२४मध्ये या पुस्तकावरील वादाने डोके वर काढले होते. सातारा येथील प्राध्यापक मृणालिनी आहेर यांनी रयत शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयात शिवाजी कोण होता?या पुस्तकाचा संदर्भ दिला म्हणून सातारा पोलिसांनी त्यांच्यावर बेकायदा कारवाईचा बडगा उगारला. राज्य सरकारने या कारवाईचे समर्थन केले. परंतु, उच्च न्यायालयाने मात्र अलीकडेच या न्यायालयाने यावर निकाल देताना राज्य सरकार व पोलिसांवर कडक ताशेरे ओढले आणि ह्यही कसली लोकशाही? तुम्हाला कायदा कळतो का?ह्ण असा सवाल केला. हे प्रकरण महाराष्ट्रातील अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरील वाढत्या दबावाचे प्रतीक ठरले. आमदार संजय गायकवाड यांनी कोल्हापूरचे प्रकाशक प्रशांत आंबी यांना रात्री फोन केला आणि धमकी दिली. ह्यतुमचेही पानसरेंसारखेच हाल होतीलह्ण असे म्हणत त्यांनी पुस्तकाचे शीर्षक आक्षेपार्ह असल्याचा आरोप केला. या विधानाचा अर्थ काय घ्यावा? एका आमदाराने अशी हिंसक धमकी दिल्याबद्दल लगेच फौजदारी कारवाई अपेक्षित होती; ती अद्याप झालेली नाही. हे प्रकरण केवळ माफी मागून संपविण्याचा प्रयत्न केला जात आहे, तेही अयोग्य आहे.

या पुस्तकात इतिहासाची मोडतोड केल्याचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा एकेरी उल्लेख करून त्यांची प्रतिमा मलीन केल्याचा आरोप करण्यात आला. त्यावर पुरोगामी संघटनांनी, हे पुस्तक छत्रपतींचा ह्यलोकराजाह्ण म्हणून इतिहास मांडत असल्याचे सांगून यावर बंदी घालण्यास विरोध केला आहे. यातली वस्तुस्थिती ही आहे की ह्यशिवाजीह्ण हा शब्द म्हणजे एकेरी उल्लेख नाही. पुस्तकाचे शीर्षक बदलण्याची मागणी करणे, पानसरे यांच्याकडून त्यांच्या तसाच उल्लेख करण्याची अपेक्षा करणे किंवा तशी जबरदस्ती करणे आणि या मागणीला लोकप्रतिनिधींकडून पाठिंबा मिळणे चुकीचे आहे. भारतीय इतिहासात आपले नाव अजरामर करणाऱ्या शिवाजी महाराजांच्या जीवनाचा अभ्यास सर्व बाजूंनी करण्यात गैर काहीच नाही. पण, त्यांच्या विषयी आम्ही सांगतो तेच आणि त्याच भाषेत लिहा, असे सांगणे हुकूमशाहीचे लक्षण असून ते अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालणारे आहे.

या पुस्तकात पानसरे यांनी शिवाजी महाराजांना एका प्रगतिशील, लोकाभिमुख आणि सर्वधर्मसमभाव मानणाऱ्या राजाच्या रूपात मांडले. पानसरे यांचा दावा असा की, शिवाजी महाराजांचा लढा हा केवळ धार्मिक नव्हता, तर तो सामाजिक न्याय आणि स्वराज्य स्थापनेचा होता. शिवाजी महाराजांनी मुस्लिम सरदारांना उच्च पदे दिली, मशिदींचा आदर केला आणि धार्मिक सहिष्णुता पाळली. त्यामुळे त्यांना समाजसुधारक आणि सर्वसमावेशक राजा म्हणून पाहणे योग्य ठरते, असे पानसरे यांनी पुस्तकातून मांडले आहे. पुस्तकात पानसरे शिवाजी महाराजांना देव किंवा अवतारम्हणून न पाहता एक मानवी नेते, शेतकऱ्यांचा मुक्तिदाता, स्त्रियांचा आदर करणारा आणि अन्यायाविरुद्ध लढणारा योद्धा म्हणून मांडतात. चारशे वर्षांपूर्वी घडलेल्या घटनेला आपण आजच्या चष्म्यातून पाहतो, केवळ इतिहास म्हणून पाहत नाही आणि हीच सर्वांत मोठी चूक ठरते. इतिहास हा केवळ भूतकाळाचा अभ्यास नसतो; तो वर्तमानातील राजकारणावरही प्रभाव टाकतो. अनेक वर्षांपासून महाराष्ट्रात शिवाजी महाराजांचे नाव राजकीय भांडवल म्हणून वापरले जाते. त्यामुळे त्यांच्या प्रतिमेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न विविध गटांकडून होत असतो. छत्रपती शिवाजी महाराज हे उभ्या महाराष्ट्रासाठी अनुकरणीय आहेत. ते कुठल्या पक्षाची अथवा संघटनेची मक्तेदारी नव्हे. त्यामुळे असे प्रयत्न हाणून पाडले पाहिजेत. महत्त्वाची गोष्ट म्हणजे इतिहास कधीही एकांगी नसतो. शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्त्वही बहुआयामी होते. ते एक कुशल योद्धा होते. ते एक दूरदृष्टी असलेले प्रशासक होते. त्यांनी त्यांच्या कार्यकाळात एका धर्मार्ला झुकते माप कधीही दिले नाही; उलट धार्मिक सहिष्णुता दाखवली. त्यांना केवळ एका चौकटीत बसवणे योग्य ठरत नाही. त्यांच्यासारख्या महान व्यक्तिमत्त्वाला एका विचारसरणीपुरते मर्यादित करणे अन्यायकारक आहे. इतिहासाचा अभ्यास वस्तुनिष्ठ पद्धतीने करणे, विविध दृष्टिकोन स्वीकारणे, राजकीय हेतूंपासून इतिहास वेगळा ठेवणे, शैक्षणिक चर्चेला प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. इतिहास नेहमी बदलत असतो किंवा अधिक अचूकपणे सांगायचे तर, इतिहासाविषयीची आपली समज नेहमी बदलत असते. इतिहास पुन्हा लिहिणे म्हणजे घडून गेलेली घटना बदलणे नव्हे, तर नव्या परिप्रेक्ष्यातून ती घटना अधिक अचूकपणे समजून घेणे होय. हे आपल्याला कळेल तेव्हा इतिहासाकडे आपण अधिक वस्तुनिष्ठ पद्धतीने बघू शकू.

ज्येष्ठ नागरिकांचे जगणे अवघड !

राष्ट्रीय गुन्हे नोंदणीच्या अहवालाची ताजी आकडेवारी नुकतीच समोर आली आहे. ही आकडेवारी देशातील ज्येष्ठ नागरिकांच्या चिंतेत भर घालणारी म्हणावी लागेल. या मागचे कारण म्हणजे मागच्या काही वर्षांमध्ये ज्येष्ठ नागरिक वाढत्या गुन्हेगारीचा बळी ठरू लागले आहेत. प्रत्येक राज्यांमध्ये ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित गुन्हे वाढत आहेत. त्यातही महाराष्ट्र राज्य ज्येष्ठ नागरिकांसाठी अधिकाधिक असुरक्षित होत चालले असून, ज्येष्ठांच्या संदर्भात देशात दुर्सया क्रमांकाचे गुन्हे महाराष्ट्रात घडणे हे राज्याच्या कायदा-सुव्यवस्थेसाठी नक्कीच अशोभनीय आहे. ह्यएनसीआरबीह्णच्या आकडेवारीनुसार २०२४ मध्ये देशात ६० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या ज्येष्ठ नागरिकांशी निगडित एकूण ३१,०६७ गुन्हे दाखल झाले होते. २०२३ मध्ये हाच आकडा २६,३०६ इतका होता. म्हणजेच केवळ वर्षभरात ज्येष्ठ नागरिकांशी निगडित गुन्ह्यात सुमारे १७ टक्क्यांनी वाढ झाली. याच काळात मध्य प्रदेशमध्ये ज्येष्ठांशी संबंधित ५, ८७५ गुन्हे, तर महाराष्ट्रात ४, ९१८ गुन्ह्यांची नोंद झाली. शहरांचा विचार केल्यास देशात दिल्लीपाठोपाठ मुंबई ज्येष्ठांसाठी असुरक्षित बनली आहे. ह्यएनसीआरबीह्णकडून दरवर्षी विविध प्रकारच्या गुन्ह्यांची आकडेवारी जाहीर केली जाते. या आकडेवारीत गुन्ह्यांचे प्रकार आणि गुन्ह्यांशी संबंधित व्यक्तीचे लिंग व वयाची माहितीदेखील दिलेली असते. या आकडेवारीचे पृथ्थकरण केल्यानंतर समाजातला नेमका कुठला घटक गुन्हेगारीचा बळी ठरतो आहे आणि त्यामागचे कारणही चकटन लक्षात येते. ज्येष्ठ नागरिकांशी निगडित गुन्ह्यांबाबत सांगायचे झाल्यास त्यांचे एकटे राहणे हे गुन्हेगारीला बळी पडण्यामागचे मोठे कारण असल्याचे तज्ज्ञ नमूद करतात.बदलत्या काळानुसार भारतातही संयुक्त कुटुंब पद्धतीचा ‘हास होऊन विभक्त कुटुंब पद्धतीला महत्त्व प्राप्त झाले आहे. कधीकाळी एकाच घरात किंवा वाडीत आई-वडील, आजी-आजोबा, काका-काकू, आत्या, चुलत भावंडे व इतर नातेवाईक रहायचे. प्रत्येक गोष्ट एकमेकांना सांगितली वा विचारली जायची, एकमेकांच्या सल्ल्याने निर्णय घेतले जायचे.

कुटुंबातील सदस्य एकमेकांच्या अडीअडचणीच्या वेळी धावून यायचे. एकमेकांना मानसिक, सामाजिक, आर्थिक सर्वच प्रकारचा आधार दिला जायचा. परंतु आता नवा संसार थाटण्याआधीच मुले विभक्त होण्याची स्वप्न बघू लागतात. आई-वडिलांपासून वेगळे राहण्यामागे निर्णय स्वातंत्र्य, वडीलधार्यांचा हस्तक्षेप नको, वादविवादापासून चार हात लांब राहण्याची भूमिका असते. तसे बघायला गेल्यास दोन्ही कुटुंब पद्धतीचे आपापले फायदे आणि तोटे आहेत. त्यातल्याच एका तोट्याचा ज्येष्ठ नागरिकांना फटका बसतो आहे. प्रामुख्याने महानगरांमध्ये ज्येष्ठ नागरिक वा वयोवृद्ध जोडपे एकटे रहातात. यातील काही पेन्शनर असतात, तर काहींनी वेगवेगळ्या ठिकाणी आर्थिक गुंतवणूक केलेली असते. वाढलेल्या वयामुळे त्यांना बँकेचे किंवा इतर आर्थिक व्यवहार करताना बर्यांचदा इतरांची मदत घ्यावी लागते. उदाहरणार्थ बँकेतून रोकड काढण्याची किंवा टाकण्याची स्लीप भरणे किंवा एटीएममधून रोकड काढताना त्यांची अनेकदा धांदल उडते.

यावेळी मदत करणारा सद्गृहस्थ असला तर ठिक अन्यथा कुठल्याही चोर भामट्याकडून त्यांची फसवणूक झालीच म्हणून समजा. अनेकदा तर मोठी रोकड सांभाळून घरी आणेपर्यंत त्यांचा श्वास वर खाली होत असतो. एखाद्या चोराने वाटेत गाठून बॅग हिसकावू नये अशी धास्ती त्यांना सतत वाटत असते. एकटेपणाची भीती त्यांच्या मनात घर करुन बसलेली असते. आता बहुतांश ज्येष्ठ नागरिकांच्या हाती जुन्या फिचर फोनऐवजी स्मार्ट फोन आलेत. सायबर चोरांसाठी तर हे स्मार्टफोन म्हणजे ज्येष्ठांची बँक खाती रिकामी करण्याचे साधनच बनले आहेत. कधी केवायसीच्या बहाण्याने, तर कधी जीपेचा ओटीपी क्रमांक मागून, कधी लॉटरीत जिंकल्याचे सांगून, तर कधी डिजिटल अरेस्टच्या नावाने ज्येष्ठ नागरिकांना धमकावून त्यांचे पैसे लुबाडले जात आहेत. एकटे राहणारे ज्येष्ठ नागरिक गुन्हेगारांचे सॉफ्ट टार्गेट ठरतात. बहुतेक ज्येष्ठांकडे साफसफाईसाठी, जेवण बनवण्यासाठी किंवा केअर टेकर म्हणून घरगडी ठेवलेले असतात. हे घरकामगार देखील ज्येष्ठ नागरिकांची फसवणूक करण्यात पटाईत असतात. घरामध्ये चोरी करणे, इतर वेगवेगळ्या प्रकारे त्यांची आर्थिक फसवणूक करण्याच्या गुन्ह्यांमध्ये घर कामगार मुख्य आरोपी असल्याचे आढळून आले आहे.अनेकदा तर ज्येष्ठ नागरिक त्यांच्या हिंसेलाही बळी पडतात. अनेक प्रकरणांमध्ये घरात एकटे राहर्णाया ज्येष्ठ नागरिकांच्या हत्याही झाल्या आहेत. पैशांसाठी घरातील कामगारानेच ज्येष्ठ नागरिकांचा खून केल्याचे प्रकारही घडले आहेत. ज्येष्ठ नागरिकांना फसवर्णायांमध्ये प्रामुख्याने त्यांच्या ओळखीचेच लोक जास्त असतात. कधी ते घर कामगार असतात, कधी नातेवाईक, ओळखीचे किंवा कधी स्वतःचीच मुले असतात.

या लोकांकडून ज्येष्ठ नागरिकांच्या असहायतेचा फायदा उचलला जातो. मध्यंतरी देशातील एका मोठ्या उद्योगपतीने सर्व संपत्ती आपल्या मुलाच्या नावावर केली होती. मात्र, काही महिन्यातच मुलाने वडिलांना घरातून बाहेर काढल्याने त्यांना मरेपर्यंत भाड्याच्या घरात राहावे लागले. अशा अनेक घटना आपल्या आजूबाजूला घडत असतात. परिणामी ज्येष्ठांना उतारवयात हलाखीचे जीवन जगावे लागते.ज्येष्ठांवरील वाढत्या गुन्ह्यांच्या पार्श्वभूमीवर ठाणे पोलिसांनी एक स्तुत्य उपक्रम हाती घेतला होता. महानगरातील सर्व सोसायट्यांमध्ये एकटे व जोडप्याने राहर्णाया ज्येष्ठ नागरिकांची यादी पोलिसांनी बनवली आणि या यादीच्या माध्यमातून ज्येष्ठ नागरिकांना वेळोवेळी भेटून त्यांच्या अडीअडचणी समजून घेण्यास सुरुवात केली. त्यासाठी प्रत्येक पोलीस ठाण्यात एक स्वतंत्र पथक निर्माण करण्यात आले.

अशा प्रकारे ठाण्यात गेल्या वर्षभरात ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेसाठी पोलिसांनी शंभरहून अधिक बैठका घेतल्या. त्यात 9 हजार ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला. खरे तर असे उपक्रम देशभरात राबवण्याची गरज आहे. यातून ज्येष्ठांना सुरक्षेसोबत मानसिक आधारही मिळू शकेल. ज्या समाजात लहान मुली, महिला, ज्येष्ठ नागरिक सुरक्षित तोच समाज सुसंस्कृत म्हणायला हवा.

पोलीस बातमी पत्र

संमिश्र

४

मुंबई, मंगळवार, १९ मे २०२६ ते २५ मे २०२६

साध्या वेशातील पोलीस, विनाचिन्हांकित गाड्या अन रात्री छापा; TCS प्रकरणातील मास्टरमाइंड निदा खानच्या अटकेची इनसाईड स्टोरी



नाशिक, नाशिकमधील टीसीएस कंपनीमधील धर्मांतर प्रकरणातील आरोपी निदा खानला चार दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे. निदा गरोदर असल्याने तिच्या आईला दोन वेळेत भेटण्याची परवानगी न्यायलयाने दिली आहे. पोलिस कोठडी दरम्यान दररोज सकाळी 11 ते 11:15 वाजता आणि सायंकाळी 5 ते 5:10 ह्या दररोज दोन वेळेत आईला भेटण्याची न्यायालयाने परवानगी दिली आहे. गेल्या 40 दिवसांपासून फरार असलेल्या निदा खानला छत्रपती संभाजीनगरमधून अटक करण्यात आली. मध्यरात्री अटकेची कारवाई केल्यानंतर पोलिसांनी आज (8 मे) नाशिकरोड न्यायालयात हजर केले. न्यायालयाने निदा खानला 11 मे पर्यंत चार दिवस पोलिस कोठडी सुनावली. 40 दिवसांच्या पळापळीचा अखेर अंत दरम्यान, निदाच्या 40 दिवसांच्या पळापळीचा अखेर अंत झाला आहे. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी राबवलेल्या एका अत्यंत गुप्त आणि वेगवान मोहिमेत निदा खानला छत्रपती संभाजीनगरच्या नारेगाव परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. निदाने अटकेपासून वाचण्यासाठी अत्यंत नियोजनबद्धरीत्या छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव परिसरातील कौसर कॉलनी निवडली होती. हे लोकेशन इतके दुर्गम होते की, ती ज्या इमारतीत लपली होती, तिच्या आजूबाजूला लांबवर एकही घर नव्हते. वर्दळ नसलेला हा निर्जन भाग असल्याने कोणालाही संशय येण्याची शक्यता नव्हती. अटकपूर्व जामिनासाठी शर्थीचे प्रयत्न दरम्यान, निदा खानने गरोदर असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करून अटकपूर्व जामिनासाठी शर्थीचे प्रयत्न केले होते. मात्र, नाशिक जिल्हा न्यायालयाने तिचा जामीन फेटाळला. जामीन फेटाळल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत पोलिसांनी ही मोठी कारवाई केली. नाशिकमधील बहुचर्चित टीसीएस धर्मांतर, लैंगिक शोषण आणि मानसिक छळ प्रकरणातील मुख्य सूत्रधार निदा खान हिच्या 40 दिवसांच्या पळापळीचा अखेर अंत झाला आहे. नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी राबवलेल्या एका अत्यंत गुप्त आणि वेगवान मोहिमेत निदा खानला छत्रपती संभाजीनगरच्या नारेगाव परिसरातून बेड्या ठोकण्यात आल्या. या अटकेचा घटनाक्रम आता समोर आला आहे. निदा खानने अटकेपासून वाचण्यासाठी अत्यंत नियोजनबद्धरीत्या छत्रपती संभाजीनगरमधील नारेगाव परिसरातील कौसर कॉलनी निवडली होती. हे लोकेशन इतके दुर्गम होते की, ती ज्या इमारतीत लपली होती, तिच्या आजूबाजूला लांबवर एकही घर नव्हते. वर्दळ नसलेला हा निर्जन भाग असल्याने कोणालाही संशय येण्याची शक्यता नव्हती. नाशिक पोलिसांच्या एसआयटी तपासात तांत्रिक माहितीच्या आधारे निदा खान संभाजीनगरमध्ये असल्याची खात्री पटली. यानंतर नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी संयुक्त कारवाईचे नियोजन केले. पोलिसांनी सलग दोन दिवस त्या संशयास्पद इमारतीवर लांबून नजर ठेवली. आरोपीला संशय येऊ नये म्हणून पोलिसांनी गणवेश टाळून साध्या वेशातील पथके तैनात केली होती. कारवाईसाठी सरकारी गाड्यांचा वापर न करता, खासगी आणि विनाचिन्हांकित वाहनांचा वापर करण्यात आला. निदा खान घरात असल्याची खात्री पटताच रात्री पोलिसांनी नियोजनबद्धरीत्या छापा टाकला आणि निदा खानला ताब्यात घेतले.

या प्रकरणातील सर्वात धक्कादायक खुलासा म्हणजे निदा खानला लपवण्यासाठी MIM नगरसेवक मतीन पटेल यांनी मदत केली होती. मतीन पटेलने दोन महिन्यांपूर्वीच कौसर पार्क येथे एक घर विकत घेतले होते, याच घरात त्याने निदा आणि तिच्या कुटुंबाला (आई, वडील, भाऊ आणि आत्या) आश्रय देण्यात आला होता. पोलिसांनी मतीन पटेलचा मोबाईल जप्त केला असून, त्यांनाही या गुन्ह्यात सहआरोपी करण्यात आले आहे. दरम्यान, निदा खानने गरोदर असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करून अटकपूर्व जामिनासाठी शर्थीचे प्रयत्न केले होते. मात्र, नाशिक जिल्हा न्यायालयाने तिचा जामीन फेटाळला. जामीन फेटाळल्यानंतर अवघ्या तीन दिवसांत पोलिसांनी ही मोठी कारवाई केली. निदा खानला आज नाशिक न्यायालयात हजर केले जाणार आहे. याच प्रकरणात अटकेत असलेले इतर आरोपी शाहरुख कुरेशी आणि रझा मेमन यांचीही चौकशी सुरू आहे. आता या प्रकरणात आणखी काय समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

अशी झाली निदा खानला अटक

नाशिक पोलिसांच्या एसआयटी तपासात तांत्रिक माहितीच्या आधारे निदा खान संभाजीनगरमध्ये असल्याची खात्री पटली. यानंतर नाशिक आणि छत्रपती संभाजीनगर पोलिसांनी संयुक्त कारवाईचे नियोजन केले. पोलिसांनी सलग दोन दिवस त्या संशयास्पद इमारतीवर लांबून नजर ठेवली. आरोपीला संशय येऊ नये म्हणून पोलिसांनी गणवेश टाळून साध्या वेशातील पथके तैनात केली होती. कारवाईसाठी सरकारी गाड्यांचा वापर न करता, खासगी आणि विनाचिन्हांकित वाहनांचा वापर करण्यात आला. निदा खान घरात असल्याची खात्री पटताच रात्री पोलिसांनी नियोजनबद्धरीत्या छापा टाकला आणि निदा खानला ताब्यात घेतले.

ऐरोली-काटई नाका कॉरिडॉरचा टप्पा-२ पूर्ण; टप्पा-१ चे काम अंतिम टप्प्यात

मुंबई। मुंबई महानगर प्रदेशातील प्रादेशिक वाहतूक व्यवस्थेत आमूलाग्र बदल घडवणारा ऐरोली-काटई नाका कॉरिडॉर प्रकल्पाने महत्त्वपूर्ण टप्पा गाठला आहे. या प्रकल्पातील दुसऱ्या टप्प्यातील ऐरोली ते ठाणे-बेलापूर रोड या उन्नत मार्गाचे काम पूर्ण झाले आहे. तर या प्रकल्पातील ठाणे-बेलापूर रोड ते राष्ट्रीय महामार्ग-४ या टप्पा-१ चे काम अंतिम टप्प्यात पोहोचले आहे. तसेच तिसऱ्या टप्प्याचे काम प्रगतिपथावर आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत(एमएमआरडी) ऐरोली-काटई नाका कॉरिडॉर प्रकल्प राबविण्यात येत आहे. तीन टप्प्यात या प्रकल्पाचे काम सुरू आहे. या प्रकल्पामुळे ऐरोली, मुंब्रा आणि काटई नाका यांना अखंड रस्त्याने जोडणी मिळणार असून प्रवासाचे अंतर लक्षणीयरित्या कमी होणार आहे. सद्यस्थितीत रस्त्यांवरील गर्दी कमी होऊन नवी मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली आणि बदलापूर दरम्यान जलद व कार्यक्षम प्रवास शक्य होणार आहे. हा कॉरिडॉर केवळ रस्ते प्रकल्प नसून महाराष्ट्राच्या भविष्यासाठीची धोरणात्मक गुंतवणूक आहे. टप्पा-१ आणि टप्पा-२ पूर्णत्वाच्या अंतिम टप्प्यात असून वाहतुकीसाठी यावर्षीच सुरू करण्यात येतील. प्रवासाचा चेहरामोहरा बदलणार ऐरोली-काटई नाका कॉरिडॉरमुळे मुंबई महानगर प्रदेशातील प्रवासाचा चेहरामोहरा बदलणार आहे. प्रमुख शहरी केंद्रांना जोडणारा हा हायस्पीड मार्ग नागरिकांसाठी तसेच मालवाहतुकीसाठी अधिक कार्यक्षम आणि सुलभ ठरेल, असे एमएमआरडीएचे आयुक्त डॉ. संजय मुखर्जी म्हणाले. प्रवासाचा वेळ ३५ मिनिटांनी कमी होणार ठाणे आणि नवी मुंबईसाठी हा प्रकल्प मोठा कनेक्टिव्हिटी बूस्टर ठरणार आहे. विशेषतः बोगद्यामुळे दोन्ही भागांदरम्यान अधिक जलद व अखंड प्रवास शक्य होईल. या प्रकल्पामुळे प्रवासाचा वेळ ३५ ते ४० मिनिटांनी कमी होणार असल्याचे उपमुख्यमंत्री व एमएमआरडीएचे अध्यक्ष एकनाथ शिंदे म्हणाले.

मुंबईत पार्किंग शुल्कात ४० टक्के वाढीचा प्रस्ताव

मुंबई। बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या वाहतूक विभागाने मुंबईतील सार्वजनिक पार्किंग सुविधांच्या शुल्कात चाळीस टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. या प्रस्तावाला तत्त्वतः मंजुरी मिळाली असून तो प्रत्यक्षात आला तर तब्बल दहा वर्षांनी हे दर वाढणार आहेत. सुधारित प्रस्ताव आता महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे यांच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. आयुक्तांच्या मंजुरीनंतर, तो वर्क्स कमिटी आणि त्यानंतर अंतिम मंजुरीसाठी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेसमोर ठेवला जाईल. सार्वजनिक पार्किंगचे तीन प्रकारांत वर्गीकरण केले जातेः विकासकांनी अतिरिक्त ऋणकच्या बदल्यात बांधलेली बहुमजली पार्किंग स्ट्रक्चर्स, रस्त्यावरील पे-अँड-पार्क (अल्पकालीन वापरासाठी रस्त्याच्या कडेला असलेले शुल्क-आधारित पार्किंग आणि रस्त्याबाहेरील पे-अँड-पार्क (वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी रस्त्यापासून दूर असलेले स्वतंत्र भूखंड यांचा त्यात समावेश होतो. बीएमसीने २ जानेवारी २०१५ रोजी सर्वसमावेशक पे-अँड-पार्क धोरण मंजूर केले होते, ज्यामध्ये पार्किंग शुल्कात ३०० ते ४००% वाढ सुचवण्यात आली होती. मात्र, तीव्र सार्वजनिक आणि राजकीय विरोधामुळे राज्य सरकारने जानेवारी २०१५ मध्ये या निर्णयाला स्थगिती दिली. फेब्रुवारी २०१७ मध्ये ही स्थगिती उठवण्यात आली, त्यानंतर पालिकेने दक्षिण मुंबईतील 'ए' वॉर्डपासून सुधारित दर लागू करण्यास सुरुवात केली. ए, बी आणि सी अशा तीन झोनमध्ये विभागलेले हे धोरण मार्च २०२१ मध्ये संपणार होते, परंतु तत्कालीन आयुक्तांच्या मान्यतेने त्याला मुदतवाढ देण्यात आली होती. एका वरिष्ठ नागरी अधिकाऱ्याने सांगितले की, जवळपास एका दशकानंतर विद्यमान पे-अँड-पार्क धोरणात बदलाचा प्रस्ताव मांडण्यात आला आहे. याला तत्त्वतः मान्यता मिळाली असून आता सविस्तर टिपणी तयार केली जाईल. हे सुधारित दर विद्यमान आणि भविष्यातील सर्व पार्किंग कंत्राटांमध्ये समाविष्ट केले जातील. दरम्यान, मुंबईतील पार्किंगच्या जागांचा नकाशा तयार करण्यासाठी बीएमसी तीन कोटी रुपयांचा डिजिटल डॅशबोर्ड विकसित करत आहे. एका स्मार्ट पार्किंग ॲप आणि वेबसाइटद्वारे नागरिकांना पार्किंगच्या उपलब्धतेबद्दल रिअल-टाइम माहिती मिळेल. यामध्ये फास्टॅग आधारित पेमेंट सुविधा देखील असेल, ज्यामुळे जादा शुल्क आकारणी आणि पार्किंग निधीचा गैरवापर थांबवण्यास मदत होईल.



कुठे लागू होणार नवीन दर?

हे सुधारित पार्किंग दर मुंबईतील पालिकेच्या सर्व पार्किंग सुविधांना लागू होतील, ज्यात खालील बाबींचा समावेश आहेः

३७ सार्वजनिक वाहनतळ

२६ रस्त्यावरील 'पे-अँड-पार्क' क्षेत्र

३५० हून अधिक रस्त्याबाहेरील 'पे-अँड-पार्क' सुविधा

घोडबंदर रस्त्यावर मृत्यूचे महाकाय दूत, दगड मातीच्या खुल्या डंपरचा वाढता धोका



ठाणे । ठाण्यातील सर्वात वर्दळीचा आणि महत्त्वाचा मार्ग समजला जाणारा घोडबंदर रोड सध्या वाहनचालक व प्रवाशांसाठी मृत्यूचा सापळा ठरत आहे. मेट्रोचे काम आणि वाढती वाहतूक कोंडी यामुळे आधीच त्रस्त असलेल्या प्रवाशांना आता उघड्या डंपरमधून होर्णाया जीवघेण्या दगड-माती वाहतुकीशी सामना करावा लागत आहे. सुरक्षिततेची कोणतीही दक्षता न घेता, भरधाव वेगाने धावर्णाया या डंपरमुळे मोठा अपघात होण्याची भीती व्यक्त होत आहे.मुंबईलगतच्या ठाण्यात नागरीकरण वाढत आहे. घोडबंदर रोडवर तर नवनवीन गृह प्रकल्पांची व इमारतींची तसेच अन्य विकासकामे सुरू आहेत. याकरीता घोडबंदर रोडवरून मोठ्या प्रमाणावर बांधकामाचे दगड घेऊन जाणारे डंपर धावत असतात. नियमानुसार, अशा प्रकारे बांधकाम साहित्य किंवा दगड वाहून नेताना ते ताडपत्रीने किंवा जाळीने पूर्णपणे झाकलेले असणे अनिवार्य आहे. मात्र, अनेक डंपर चालक या नियमांना केराची टोपली दाखवत दगडांचे ढिगारे डंपरमध्ये रचून भरधाव वेगाने वाहने हाकतात.

घोडबंदर रोडवर आधीच वाहनांची वर्दळ प्रचंड असते. अशातच एखादा दगड डंपरमधून निसटून खाली पडल्यास, मागून येर्णाया दुचाकीस्वाराला अथवा पादचार्यांना इजा होऊ शकते. डंपरमधून अचानक दगड पडल्यास मागची वाहने नियंत्रण गमावून साखळी अपघात होण्याची दाट शक्यता आहे. मेट्रो तसेच विविध विकासकामांमुळे रस्ते अरुंद असल्याने भरधाव डंपरच्या बाजूने प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी वाहतूक पोलीस तैनात असूनही उघडपणे नियमभंग सुरू आहे. तेव्हा, प्रादेशिक परिवहन विभाग आणि वाहतूक विभागाने उघड्यावर माल वाहून नेर्णाया डंपरवर दंडात्मक कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरीक करीत आहेत.

उघड्या डंपरमधुन घोडबंदर रोडवर सुरू असलेली दगड-माती वाहतूक ही नागरिकांच्या जीवाशी बेफिकिरी आहे. नियम धाब्यावर बसवर्णाया या डंपर चालकांवर आणि संबंधित ठेकेदारांवर तातडीने कठोर कारवाई झाली पाहिजे. एखाद्याचा जीव गेल्यानंतर प्रशासन जागे होणार का ?

तीन महिन्यांतच BMC मध्ये राजकीय बदल; गटनेते अमय घोले यांचा सुधार समितीचा राजीनामा

मुंबई। एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचे नगरसेवक तथा पालिकेतील गटनेते अमय घोले यांनी सुधार समितीचा राजीनामा दिला आहे. एकनाथ शिंदे यांच्या जवळचे मानले जाणारे आमदार तुकाराम काते यांची सून व नगरसेविका समृद्धी काते यांची सुधार समिती सदस्य पदी वर्णी लागणार आहे. तर शिंदे सेनेचे आमदार दिलीप लांडे यांच्या जवळच्या अश्विनी माटेकर यांची शिक्षण समिती सदस्य पदी वर्णी लागणार आहे. मुंबई महापालिकेत महिन्यांतच तीन राजकीय बदल झाल्याने चचेर्ला उधाण आले आहे. सुधार समितीत सध्या २६ सदस्य आहेत. यामध्ये भाजपचे दहा सदस्य असून शिवसेना शिंदे गटाचे तीन सदस्य असून ऊर्वरित सदस्यांमध्ये काँग्रेस, शिवसेना उबाठा, एमआयएम, मनसेचा नगरसेवक आहे. या समितीत घोलेही सदस्य आहेत. तर शिवसेनेच्या अंजली नाईक या शिक्षण समितीच्या सदस्यही आहेत. समृद्धी काते, अश्विनी माटेकर यांना संधी शिवसेनचे आमदार दिलीप लांडे आणि आमदार तुकाराम काते यांनी आपल्या नातेवाईक आणि जवळच्यांची वर्णी लागावी, यासाठी पक्ष श्रेष्ठींकडे पाठपुरावा केला होता. काते यांची सून समृद्धी काते या नगरसेविका असून त्यांची सुधार किंवा अन्य एखाद्या समितीवर वर्णी लागावी, यासाठी प्रयत्न करत होते. तर आमदार दिलीप लांडे यांनी पत्नी व नगरसेविका शैला लांडे किंवा नगरसेविका अश्विनी माटेकर यांची शिफारस पक्षश्रेष्ठींकडे केली होती. अखेर यावर पडदा पडला असून तुकाराम काते यांची सून समृद्धी काते आणि अश्विनी माटेकर या दोघा नगरसेविकांना संधी देण्याचा निर्णय पक्षश्रेष्ठींनी घेतला आहे.



मुंबई विमानतळावरील उड्डाणे पुन्हा सुरू; देखभालीच्या कामामुळे धावपट्टी सहा तास बंद, पावसाळ्यापूर्वीची तांत्रिक तपासणी यशस्वीरीत्या पूर्ण

मुंबई। जगातील सर्वाधिक वर्दळीची धावपट्टी असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (सीएसएमआयए) पावसाळापूर्व देखभालीचे काम गुरुवारी यशस्वीरीत्या पूर्ण झाले. सकाळी ११ वाजता सुरू झालेला हा सहा तासांचा तांत्रिक ब्लॉक सायंकाळी ५ वाजता संपला असून, त्यानंतर विमानतळावरील सर्व उड्डाणे पूर्ववत झाली आहेत. मुंबईत येणाऱ्या मान्सूनच्या पार्श्वभूमीवर विमानांच्या सुरक्षित संचालनासाठी हे काम दरवर्षी हाती घेतले जाते. या सहा तासांच्या कालावधीत ३,४४८ मीटर लांबीची मुख्य धावपट्टी (०९/२७) आणि २,८७१ मीटर लांबीची दुय्यम धावपट्टी (१४/३२) तांत्रिक तपासणीसाठी बंद ठेवण्यात आली होती. मुंबई विमानतळावरून दररोज सुमारे ९५० विमानांची ये-जा होत असते. पावसाळ्यात विमाने उतरताना धावपट्टीवर घसरू नयेत आणि तांत्रिक बिघाड होऊ नयेत, यासाठी विशेष इंजिनिअरिंग तपासणी करण्यात आली. धावपट्टीवरील विमानांच्या टायरचे साचलेले रबर काढून टाकणे हे या देखभालीतील सर्वात महत्त्वाचे काम होते. यामुळे विमानांना ब्रेक लावताना आवश्यक घर्षण मिळते. यासोबतच धावपट्टीवरील ३,००० हून अधिक दिवे आणि संबंधित सब-स्टेशन्सचे ऑडिट करण्यात आले. अतिवृष्टीच्या काळात पाण्याचा निचरा वेगाने व्हावा, यासाठी ड्रेनेज यंत्रणेची स्वच्छता करण्यात आली, तसेच कमी दृश्यमानतेच्या काळात माहिती तंत्रज्ञान आणि नेव्हिगेशन यंत्रणा विनाखंड सुरू राहावी, यासाठी केबल नेटवर्कची चाचणी करण्यात आली. सहा महिनेआधाची तयारी या कामासाठी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडने (एमआयएएल) सहा महिनेआधीच तयारी सुरू केली होती.



देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विमान कंपन्यांना याची पूर्वकल्पना देण्यात आली होती. जेणेकरून प्रवाशांची गैरसोय टाळण्यासाठी त्यांना विमान फेऱ्यांचे नियोजन करता येईल. पावसाळ्यातील आव्हानात्मक हवामानात धावपट्टीची पायाभूत सुविधा सुरक्षित ठेवण्यासाठी ही प्रतिबंधात्मक देखभाल अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रवक्त्याने सांगितले.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय झ गाळा नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र), वेथे छापून २, राजाराम सी.एच.एस. लिमिटेड, बंदरवाडी, नवघर रोड, भाईंदर (पुर्व), जिल्हा ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. संपादक झ श्री. डॉ. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमान पत्रात प्रसिध्द होणाऱ्या बातम्या/लेख/जाहिराती यांची जवाबदारी संबंधीत वार्ताहर, लेखक आणि जाहिरात प्रतिनिधी यांच्यावर राहील.) भ्रमणध्वनी ८४२४९८९८९८. Email ID: policebatmipatra@gmail.com

Printed, Published and owned by Mr.Dr. Deepak MoreshwarNaik Printed at SOMANI PRINTING PRESS, OFFICE UNIT NO. 4, N.K.INDUSTRIAL ESTATE, NEAR PRAVASI INDUSTRIAL ESTATE, GATE NO. 2, GOREGAON (E), MUMBAI 400063, MAHARASHTRA, Published At 2, RajaramChs. Ltd., Bunderwadi, Navghar Road, Bhayander(E), Dist - Thane, Pincode 401105, Maharashtra. Editor Mr. Dr. Deepak Moreshwar Naik. Mo.8424989898, Email ID: policebatmipatra@gmail.com